# MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION

MERC

13th floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai-400 005
**Tel. No. :** (022) 2216 3964 / 65 / 69, **Fax No. :** (022) 2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in


ADVT. No. : 03/2015-16

## TENDER NOTICE

### Appointment for External Independent Agency / Consulting Firm for asset valuation of The Mula Pravra Electricity Co. Op. Society Ltd in accordance with Judgment issued by ATE in Appeal No. 221 of 2014

**Maharashtra Electricity Regulatory Commission (MERC)** under Section 86 of the Electricity Act, 2003 (EA 2003) undertakes various functions, mainly determination of Tariff for generation, transmission and wheeling of electricity, bulk or retail supply of electricity, as the case may be, within the State of Maharashtra, to regulate electricity purchase and procurement process of Distribution Licensees and issue licences to persons seeking to act as Transmission Licensee, Distribution Licensee, and Electricity Traders, and promote cogeneration and generation of electricity from renewable sources of energy.

**The Mula Pravara Electricity Co-Op. Society Ltd. (MPECS),** Shrirampur was supplying electricity in its area of distribution covering over 183 villages in five Talukas (Shrirampur, Rahuri, Nevasa, Sangamner and Rahata) of Ahmednagar District in the State of Maharashtra upto **31st January, 2011.** After expiry of licence of MPECS for distribution of electricity, vide Order **Dtd. 27th January, 2011** in **Case No. 85 and 87 of 2010,** the Commission had permitted **Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd. (MSEDCL)** to supply electricity in the area of **MPECS w. e. f. 1st February, 2011** using the existing distribution assets belonging to **MPECS. MPECS** had filed an Appeal before the Appellate Tribunal of Electricity on the issue of use of assets by **MSEDCL** and regarding determination of charges for the use of such assets.

In accordance with the Judgment **Dated 13th March, 2015** issued by Appellate Tribunal of Electricity in **Appeal No. 221 of 2014,** it is required to carry out Valuation of **MPECS'** assets being used by **(MSEDCL)** and determination of charges payable by **MSEDCL** to **MPECS** for use of such assets.

**MERC,** therefore intends to appoint External Independent Agency / Consulting Firm to carry out the task of asset valuation and determination of compensation payable by **MSEDCL** to **MPECS**.

Detailed scope of work, eligibility and qualification required, EOI submission format and procedure as well as EOI evaluation methodology etc. is available on **MERC's** website **www.merc.gov.in / www.mercindia.org.in.** Interested Independent Agencies / Consulting Firms may submit EOI / bids latest by **30th June, 2015** before **4.00 p. m.**

Date : 01.06.2015
Place : Mumbai

Sd/-
**Secretary,** MERC

SIZE : 12 (W) X 15 (H) = 180 SQ. C. M.; CAPTION KEY NO. MULA (E)




# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
**दूरध्वनी क्र.** (०२२) २२१६ ३९ ६४ / ६५ / ६९, **फॅक्स क्र.** : (०२२) २२१६ ३९ ७६
**ई-मेल :** mercindia@merc.gov.in **संकेतस्थळ :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in


जाहिरात क्र. : ०३/२०१५-१६

## निविदा सूचना

### विद्युत अपील न्यायाधिकरणाने सन २०१४ च्या प्रकरण क्र. २२१ मध्ये दिलेल्या निकालानुसार मुळा-प्रवरा इलेक्ट्रिसिटी सहकारी सोसायटी लि.च्या मालमत्तांचे मूल्यांकन करण्यासाठी बाह्य स्वातंत्र संस्था / सल्लागार फर्मची नियुक्ती करण्याबाबत

विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ८६ अंतर्गत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून (आयोग) महाराष्ट्र राज्यात विविध प्रकारची कामे, प्रामुख्याने विजेची निर्मिती, पारेषण आणि वहनाचे, विजेच्या घाऊक किंवा किरकोळ पुरवठ्याचे दर निश्चित करणे, जसे असेल तसे, वितरण परवानाधारकांच्या वीज खरेदी आणि वीज प्राप्त करून घ्यावयाच्या प्रक्रियेचे नियमन करणे आणि पारेषण परवानाधारक, वितरण परवानाधारक आणि विजेचे व्यापारी म्हणून काम करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना परवाना मंजूर करणे तसेच सह-निर्मितीस व नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून विजेची निर्मिती करण्यास चालना देणे इ. कामे करण्यात येतात.

**द मुळा-प्रवरा इलेक्ट्रिसिटी सहकारी सोसायटी लि. (मुळा-प्रवरा सोसायटी)**, श्रीरामपूर ही सोसायटी त्यांच्या वितरण क्षेत्रातील महाराष्ट्र राज्याच्या अहमदनगर जिल्ह्याच्या पाच तालुक्यातील (श्रीरामपूर, राहुरी, नेवासा, संगमनेर व रहाटा) १८३ गावांना विजेचा पुरवठा **३१ जानेवारी २०११** पर्यंत करीत होती. **मुळा-प्रवरा सोसायटी**च्या वितरण परवान्याची मुदत संपल्यानंतर, आयोगाने **सन २०१० च्या प्रकरण क्र. ८५ आणि ८७ मधील दिनांक २७ जानेवारी २०११ च्या** आदेशाने, **मुळा-प्रवरा सोसायटी**च्या वितरण क्षेत्रात, **मुळा-प्रवरा सोसायटी**च्या मालकीच्या विद्यमान वितरण मालमत्तांचा वापर करून, दि. १ फेब्रुवारी, २०११ पासून विजेचा पुरवठा करण्यास **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड**ला (**महावितरण कंपनी**) परवानगी दिली. महावितरण कंपनीने **मुळा-प्रवरा सोसायटी**च्या मालमत्तांचा वापर करण्याच्या प्रश्नासंबंधी आणि त्यासाठी महावितरण कंपनीने **मुळा-प्रवरा सोसायटी**ला अदा करावयाचे आकार निश्चित करण्यासंबंधी **मुळा-प्रवरा सोसायटी**ने विद्युत अपील न्यायाधिकरणासमोर अपील दाखल केले होते.

विद्युत अपील न्यायाधिकरणाने **सन २०१४ च्या अपील क्रमांक २२१** मध्ये **दिनांक १३ मार्च २०१५** रोजी दिलेल्या निकालानुसार, महावितरण कंपनीकडून वापर करण्यात येत असलेल्या **मुळा-प्रवरा सोसायटी**च्या मालमत्तांचे मूल्यांकन करण्याची आणि महावितरण कंपनीने अशा मालमत्तांच्या वापरासाठी **मुळा-प्रवरा सोसायटी**ला अदा करावयाचे आकार निश्चित करण्याची आवश्यकता आहे.

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने मुळा-प्रवरा सोसायटी**च्या मालमत्तांचे मूल्यांकन करण्यासाठी आणि **मुळा-प्रवरा सोसायटी**ला **महावितरण कंपनी**ने अदा करावयाचे आकार निश्चित करण्याच्या कामासाठी बाह्य स्वतंत्र संस्था / सल्लागार फर्म नियुक्त करण्याचे ठरविले आहे.

कामाची व्याप्ती, पात्रता आणि आवश्यक अर्हता, स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्याचा नमुना आणि कार्यपद्धती त्याचप्रमाणे स्वारस्य अभिव्यक्तीच्या मूल्यांकनाची पद्धत इ. बाबतचा सविस्तर तपशील आयोगाच्या **www.merc.gov.in / www. mercindia.org.in** या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. इच्छुक स्वतंत्र संस्था / सल्लागार फर्म यांनी त्यांची स्वारस्य अभिव्यक्ती / निविदा आयोगास कृपया उशिरात उशिरा **३० जून, २०१५** रोजी **दुपारी ४.०० वाजेपर्यंत** किंवा त्यापूर्वी पाठवाव्यात.

दिनांक : ०१.०६.२०१५
ठिकाण : मुंबई

स्वाक्षरी/-
**सचिव,** मविनिआ

SIZE : 12 (W) X 15 (H) = 180 SQ. C. M.; CAPTION KEY NO. MULA (M)